
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय सतरावा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

ई साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय सतरावा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)


२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com



ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604



©श्री विजय पांढरे(२०१२)



**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**



प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नम: ॥

## अध्याय सतरावा

# श्रद्धात्रयविभागयोग

या विश्वाचा आभास । जयाकारणे जाई लयास । त्या श्रीगणेशास । नमन माझे ॥१॥
त्रिगुणात त्या अडकून । नि त्रिपुटीत त्या फसून । जीवभाव तो वाढून । भ्रमलो होतो ॥२॥
तुझ्या वचनामृताकारण । जाहले स्वरूपाचे स्मरण । काढलं मला मायेतून । भगवंता तू ॥३॥
जे तुझ्याविषयी मूढ । तयासाठी तू वक्रतुंड । ज्ञानियासी तू अखंड । ब्रह्मचि देवा ॥४॥
डोळे बारीक बा करून । तू उघडझाप करणं । त्यात सृष्टीचे लय प्रकटन । होतसे देवा ॥५॥
हलवता प्रवृत्तीरुपी कान । सुगंधी मदाचा वारा सुटणं । मग जीव भुंगे होऊन । गंडस्थळा पूजती ॥६॥
हलवता निवृत्तीरूपी कान ।बांधलेली पूजा विस्कटून ।होणे ब्रह्ममयतेच प्रकटन ।आत्मज्ञान अर्जुना ॥७॥
नामरूप मायेचा विलास । जो दावित असे जगदाभास । ते तांडवचि तुझे खास । भगवंता माझ्या ॥८॥
आणिकही आश्चर्य दातारा । होतो तू जयाचा सोयरा । सोयरीकेच्या त्या व्यवहारा । मुकेचि तो ॥९॥
तुटता बंधनाचा ठाव । प्रकटे एकात्मतेचा भाव । मग समाधानाचे गाव । प्रकटते अंतरी ॥१०॥
द्वैतभाव जातसे संपून । होता ते आत्मज्ञान ।देवा तुला वेगळं मानणं । द्वैत ते ॥११॥
तुला वेगळे मानून । जे करती बा साधन । तया कधीच आत्मज्ञान । होत नाही ॥१२॥
जे ध्यानात तुला देखती । नाही तया तुझी प्राप्ती । जे ध्यानात विरून जाती । तया होते ज्ञान ॥१३॥
त्या जाणिवेच्या रुपानं । तुझं सर्वत्र बा नांदणं । वेदाही तुझे आकलन । कठीण भगवंता ॥१४॥
मौनात तुझं प्रकटन । व्यर्थ ते स्तोत्रांचं रटणं । द्वैतात तुला ते भजणं । मायाचि असे ॥१५॥
तुला देव कल्पून । सेवा तुझी करणं । ऐसा भेद मानणं । देवा तो द्रोह ॥१६॥
होण्या तुझे ज्ञान । काहीच न लगे साधन । विरून जाणे मन । सूत्र आहे ॥१७॥
जसे न ठेवता वेगळेपण । मिठाने अन्नात विरणं । तयासीच बा नमन । म्हणतो मी देवा ॥१८॥
जसं कापसाच्या वातीनं । दिवाच होऊन जाणं । तैसे ब्रह्ममय होणं । नमन आहे ॥१९॥
तैसे करून नमन । मी जाहलो परिपूर्ण । म्हणून गीतेचे निरूपण । प्रकटले येथे ॥२०॥
सोळाव्याच्या अंती । भगवंताने केली स्पष्टोक्ती । कर्तव्य अकर्तव्याची जाणती । आवश्यक आहे ॥२१॥
योग्य अयोग्याची येण्या जाण । शास्त्रास मानणे प्रमाण । सांगितलं होत स्पष्ट करून । भगवंताने तेथे ॥२२॥
तेव्हा अर्जुनाच्या मनात । एक शंका असे उठत । नाहीच का ज्ञान होत । शास्त्रांच्यावीण ॥२३॥
नागाच्या फणीवर पाय ठेवूनि । कैसा काढावा तो मणी । कैसे केस घ्यावे उपटूनि । सिंहाच्या नाकातले ॥२४॥
काम इतके हे कठीण । कैसे कोणा ज्ञान होईन । मग आहेच की मरण । अज्ञानात ॥२५॥
शास्त्रांची संख्या पाहता । तेथे आढळे असंख्यता । त्यांच्यातील ती एकवाक्यता । समजावी कशी ॥२६॥
समजली जरी एकवाक्यता । संसारात या राहता । कशी प्रकटावी ती ब्रह्ममयता । जीवाच्या ठायी ॥२७॥
या शास्त्रांना जाणणं । काम बा ते कठीण । मग सर्वांना आत्मज्ञान । व्हावे कैसे ॥२८॥
शास्त्रानुसार ते वागणं । बहुत बा कठीण । मग मूर्ख आणि मुमुक्षूनं । वागावे कैसे ॥२९॥
सतराव्या अध्यायात । हेच अर्जुन असे विचारत । अवधान ते देत । ऐकावे तुम्ही ॥३०॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अंतरी जो विरक्त । सर्व कलात पारंगत । त्या देवासही नवल वाटतं । ऐकता प्रश्न ॥३१॥
अर्जुन शौर्याचा आधार । जो सोमवंशाचा शृंगार । सर्व सुखाचे उपचार । उपलब्ध ज्याला ॥३२॥
असल्याकारण प्रज्ञावान । तया ब्रह्मविद्येची तहान । म्हणूनच शंका ती विचारणं । तयाने देवा ॥३३॥
मग म्हणे तो अर्जुन । मला आवडले ब्रह्मज्ञान । म्हणून शंकेचं विचारणं । आहे हे देवा ॥३४॥
शास्त्रांच्या त्या वाचून । न होते आत्मज्ञान । हे तुझ सांगणं । न समजले मला ॥३५॥
साधनेचे ते स्थान । जयाना उपलब्ध नसणं । आणि शास्त्राभ्यास करणं । न ठाऊक जया ॥३६॥
गुरूंचे ते मार्गदर्शन । आणि नसता बा साधनं । मग शास्त्रांचे ते ज्ञान । दूर तेव्हा ॥३७॥
पूर्वपुण्याई नसल्याकारणं । प्रज्ञाही दुरावणं । मग मोक्ष प्राप्त होणं । दूर तेथे ॥३८॥
तरी नाही शास्त्रांचे ज्ञान । न समजते साधन । मग जीवाचे अकल्याण । आपोआप ॥३९॥
तरी शास्त्रे ती अभ्यासून । साधना त्या करून । सुखी होण्याची तहान । जीवाला देवा ॥४०॥
सूक्ष्म ते ज्ञान । प्राप्त व्हावे म्हणून । जिवाची ती वणवण । चालते तेथे ॥४१॥
अक्षरे ती घोटून । जसं बालकानं शिकणं । तसे घेऊन मार्गदर्शन । प्रयत्न करती ॥४२॥
तैसे सर्वशास्त्रनिपुण । ऐसे जयांचे आचरण । तयांना मानती प्रमाण । श्रद्धेपोटी ॥४३॥
मग शिवास त्या पूजणे । भूमि आदि महादाने । होमहवन करणे । घडे तेथे ॥४४॥
ऐसे सत्त्व रज तमाकारण । जयांच बा वागणं । तयांची काय गती होणं । सांगावे देवा ॥४५॥
ऐसा वैकुंठीचा प्राण । जो वेदातील ज्ञान । जयाच्या त्या आधारानं । प्रकटले विश्व ॥४६॥
जो काळाचेही कारण । असामान्य आणि शक्तिमान । गूढ पण आनंदघन । स्वभाव ज्याचा ॥४७॥
हे सर्व बा गुण । जयाच्या त्या कारण । तो भगवान कृष्ण । बोलला स्वये ॥४८॥

- श्री भगवानुवाच -

कल तुझ्या मनातला । आहे बघ मी जाणितला । सर्व शास्त्रातील एकरुपतेला । तू जाणीत नाही ॥४९॥
नुसती श्रद्धाच असता मनात । ज्ञान करू पाहे तू प्राप्त । श्रद्धेने पोहचणे ज्ञानापर्यंत । सोपे नाही ॥५०॥
जैसी श्रद्धा मनात । तैसेच अनुभव असती येत । मनास बा करते संमोहित । श्रद्धा अर्जुना ॥५१॥
गंगोदक जरी झाले । मद्याच्या सान्निध्यात आले । मग ते वायाच गेले । तैसे अर्जुना ॥५२॥
जरी शीतल ते चंदन । परी अग्नीसी होता मीलन । अग्नीच होऊन जाणं । तैसे अर्जुना ॥५३॥
श्रद्धेच्या त्या कारण । श्रद्धाच अनुभवा येणं । ते अवघेच बा संमोहन । मनाचे अर्जुना ॥५४॥
जिवांअंगी असती त्रिगुण । मग त्या श्रद्धेकारण । त्रिगुण आपणच आपले अनुभवणं । श्रद्धा अर्जुना ॥५५॥
सर्व प्राणी मुळात । त्रिगुणातच बा जन्मतात । त्रिगुणाकारणेच असतं । अस्तित्व तया ॥५६॥
दोन गुण मागे हटती । एकाची होते उन्नती । तैसेच होते बा वृत्ती । मनाची अर्जुना ॥५७॥
वृत्तीप्रमाणे मन । मनाप्रमाणे ते आचरण । आणि मरूनही देह धारण । करतसे वृत्ती ॥५८॥
बीज मरता झाड होते । झाड मरून बीजात सामावते । ऐसी सृष्टी चालते । कोटी कल्प ॥५९॥
तियापरी इये अपारे । होती जाती जन्मांतरे । पण त्रिगुणत्व न सरे । या प्राणियांचे ॥६०॥
श्रद्धेच्या त्याकारण । गुणांचेच होते संवर्धन । गुणाकारणेच भवचक्र चालणं । घडे येथे ॥६१॥
जेव्हा सात्त्विकता वाढते । तेव्हाच ज्ञानाची तहान लागते । अन्यथा होणे बरबाद ते । रज तमाकारणे ॥६२॥
सत्त्वाच्या त्या द्वारानं । शक्य मोक्षाचे प्रकटन । पण त्रिगुण विसर्जित होणं । सूत्र आहे ॥६३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

सत्त्वाचा पराभव करून । जेव्हा बळकटे रजोगुण । मग कर्माचा गुलाम होणं । नशीब त्यांचे ॥६४॥
आग तमाची लागता । वाढते विषयांची लोलुपता । इंद्रियांच्या नादी लागता । नरकवास ॥६५॥
सत्त्वरजतम विहिन । शुद्ध श्रद्धा असणं । जीवाला बा कठीण । आहे अर्जुना ॥६६॥
म्हणून श्रद्धा साहजिक । असे पै त्रिगुणात्मक । भेद रजतमसात्त्विक । असती तिचे ॥६७॥
जैसे उदक एकच असतं । पण मारक मिसळता विषात । आणि गोड ते उसात । लागते तैसे ॥६८॥
तैसे तमाने होऊन युक्त । जो जन्ममरण असे भोगत । श्रद्धा तयाची असे होत । तमोगुणी ॥६९॥
काजळ आणि काळी शाई । यात फरक नाही काही । तैसी श्रद्धाच तम होई । अर्जुना तेथे ॥७०॥
त्या रजोगुणाकारण । श्रद्धेनेच रजोगुण होणं । आणि सत्त्वगुणाकारण । सात्त्विक ती ॥७१॥
जगत हे बा सकळ । श्रद्धेचाच तो खेळ । त्रिगुणच येथे निखळ । वर्तती अर्जुना ॥७२॥
ऐसे त्रिगुणाच्याकारण । श्रध्देनं संमोहित होणं । ते बा अर्जुना जाण । अंतरी तू ॥७३॥
झाड त्या फुलाहून । मन मनुष्याचे बोलण्याहून । कर्म सुखदु:खाहून । ओळखावे अर्जुना ॥७४॥
श्रद्धेच्या या रुपाना । कसे ओळखावे अर्जुना । तयाच्या त्या खुणा । ऐक आता ॥७५॥
अर्जुना त्या लक्षणावरून । हे श्रद्धेचे प्रकार ओळखून । सत्त्व रज तमास निरसून । व्हावे बा मुक्त ॥७६॥
सात्त्विक श्रद्धेच्याकारण । स्वर्गसुख बा आवडणं । सद्‌गुणांचं ते वाढणं । सात्त्विकता अर्जुना ॥७७॥
शास्त्रे ती शिकती । आणि होमहवन करती । आणि स्वर्गात बा जाती । होता अंत ॥७८॥
श्रद्धा राजस बा होणे । मग राक्षस पिशाच्चा भजणे । तो अहंकार बा वाढवणे । आहे अर्जुना ॥७९॥
श्रद्धा जी का तामसी । ते मी सांगेन तुजसी । ती केवळ पापराशी । निर्दयी अर्जुना ॥८०॥
जीवांची हत्या करून । संध्याकाळी स्मशानी जाऊन । भूतप्रेतासी ते भजणं । कर्म त्यांचे ॥८१॥
ऐसे श्रद्धेचे प्रकार तीन । त्या त्रिगुणांच्या कारण । हे अंतरी बा उमजणं । सार आहे ॥८२॥
सात्त्विक श्रद्धा जोपासून । रज तम टाकाव्यात झाडून । प्रथम रज तम संपणं । सूत्र आहे ॥८३॥
जयाची झाली सात्त्विक मती । तया दूर नाही कैवल्यप्राप्ती । सात्त्विकता प्रथम प्रगती । आहे अर्जुना ॥८४॥
जरी न वाचले ब्रह्मसूत्र । जाणेच न बा शास्त्र । ध्यान जप मंत्रतंत्र । न ठाऊक तया ॥८५॥
पण वडिलांनी जैसे आचरले । तेच बा याने अंगीकारले । विहित कर्म ते केले । मनोभावे अर्जुना ॥८६॥
आपल्या वडिलांच्या प्रमाणे । सात्त्विकतेने ते वागणे । मग तैसेचि फळ मिळणे । अनिवार्य अर्जुना ॥८७॥
एकाने प्रयत्ने दिवा लावावा । दुज्याने आयता पेटवावा । तरी का तो वाया जावा । सांग बा अर्जुना ॥८८॥
एकाने खूप खर्च करून । बांधले अर्जुना निवासस्थान । मग तेथे दुसऱ्यांनीही रहाणं । सोपेच की ॥८९॥
जो बा तळे असे बांधत । तयाची तहान असे भागत । आणि इतरांना तान्हेलेलं ठेवतं । तळे का कधी ॥९०॥
गौतमाने प्रयत्ने गंगा आणली । ती का गौतमासच पावली । आणि इतरांना ओहळ झाली । गंगा का कधी ॥९१॥
ऐसे आपल्या बुद्धिप्रमाणे । श्रद्धा ती अनुसरणे । आणि मग मूर्खानेही तरणे । आपोआप ॥९२॥
जे शास्त्र नसती मानत । आणि शास्त्राचा द्वेष करतात । मग काही बाही बोलतात । शास्त्राविषयी ॥९३॥
वडिलांचे जे शास्त्र आचरण । तया यांनी वाकुल्या दाखवणं । आणि चेष्टा ती करणं । पंडितांची अर्जुना ॥९४॥
धनाच्या त्या घमेंडीकारण । धर्माविरुद्ध त्यांनी वागणं । करणे अनीतीचे आचरण । आवडे तया ॥९५॥
स्वत:ला आणि दुसऱ्यांना । जखमा करून अर्जुना । यज्ञाच्या त्या कारणा । वापरती ते ॥९६॥
रक्तामांसाचे ते होमहवन । समंधाची पूजा करणं । बालकांना बळी देणं । कर्म त्यांचे ॥९७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

इच्छांच्या त्या कारण । क्षुद्र देवतांचे पूजन । सप्ताहभर उपास करणं । तयांनी अर्जुना ॥९८॥
ऐसे तमोगुणाच्या शेतात । क्लेश पापाचे बी पेरतात । मग तेच असे उगवत । तयांच्या नशिबी ॥९९॥
स्वत:ला हातपाय नसणं । आणि नावेतही नाही जाणं । आहेच नशिबी मग बुडणं । तयांच्या अर्जुना ॥१००॥
जो वैद्याशी वैर करतो । आणि औषधा लाथाडून देतो । मग रोगाकारणे तो विव्हळतो । तैसे अर्जुना ॥१०१॥
शत्रूच्या त्या नाशाकारणे । आपलेच डोळे काढणे । ऐसेच त्यांचे वागणे । आंधळ्या जैसे ॥१०२॥
शास्त्रांना ते झिडकारून । सैरावरा धावणे मोहानं । तयांची ऐसीच गती होणं । अनिवार्य अर्जुना ॥१०३॥
ऐसे कामवासना वाढवून । क्रोध अंगी बाणवून । आत्मतत्त्वा टाकती पुरून । दु:खाच्या खड्डयात ॥१०४॥
आपल्या दुसऱ्याच्या शरीराला । देणे दु:खाचा घाला । परी तो मलाच आत्म्याला । भोगावा लागतो ॥१०५॥
काया वाचा आणि मनाने । पापांशी संबंध न ठेवणे । इतकेच ते बा सांगणं । माझे तुला ॥१०६॥
प्रेत घराबाहेर काढणे । पाप्यास लोटून घालवणे । शौच ते हाताने धुणे । पडेच की अर्जुना ॥१०७॥
तेथे शुद्धतेची आशा । तो लेप न मानणे जैसा । पापासी सांडावया तैसा । उपदेश हा ॥१०८॥
होईल जेव्हा पाप्याचे दर्शन । तेव्हा कर माझे स्मरण । या पापानं न जुमानणं । दुसऱ्या कोणा ॥१०९॥
म्हणून श्रद्धा जी सात्त्विक । जीवनी फक्त तीच एक । जतन करावी सविवेक । अर्जुना माझ्या ॥११०॥
तैसाच संग धरणे । जेणे सात्त्विकता वाढणे । आणि सत्त्वगुणी आहार घेणे । अर्जुना तू ॥१११॥
जैसा आहार घेणं । तैसाच स्वभाव बनणं । आहाराकारणेच गुण । प्रकटती मनी ॥११२॥
अर्जुना बा तू जाणतो । जो मदिरा सेवन करतो । मग तत्क्षणीच तो माजतो । तैसे अर्जुना ॥११३॥
जे अन्न करणे सेवन । तयांनीच कफ वात बनणं । जसं तापाचं ते वाढणं । दुधाकारणे ॥११४॥
जैसे अमृताचे कारणे । अमर बा होणे । आणि विष ते पिणे । मृत्यूच की ॥११५॥
जैसा आहार घेणार । धातू तैसाच बनणार । मग भाव तैसाच प्रकटणार । अंतरी अर्जुना ॥११६॥
जेव्हा भांडे ते तापते । आतले पाणीही गरम होते । जैसे बनती धातू ते । वृत्ती तैसी ॥११७॥
म्हणून सात्त्विक अन्न खाऊन । वाढवावा तो सत्त्वगुण । रज तमा दूर सारणं । कल्याण अर्जुना ॥११८॥
सात्त्विक कशाला म्हणणं । राजस तामसाचे काय लक्षणं । संपूर्ण लक्ष ते देऊन । ऐकावे अर्जुना ॥११९॥
जरी एकच बा आहार । कैसे तीन तयांचे प्रकार । सांगतो ते सविस्तर । अर्जुना तुला ॥१२०॥
आपल्याच आवडीप्रमाणं । जेवणाऱ्या आवडते जेवण । जेवणारा त्रिगुणाची खाण । आहे अर्जुना ॥१२१॥
जीव जो कर्ता भोक्ता । तो गुणाकारणेच स्वभावता । पावून ती त्रिविधता । वर्ते त्रिविध ॥१२२॥
तीन प्रकारच्या आहाराकारण । यज्ञ आणि तपदान । यांचेही प्रकार तीन । होती बा अर्जुना ॥१२३॥
या आहाराची लक्षणं । मी सांगतो सोपी करून । कान ते बा देऊन । ऐक तू अर्जुना ॥१२४॥
त्या पूर्वसुकृताच्या कारण । जर असेल अर्जुना सत्त्वगुण । मग गोड पदार्थ आवडणं । साहजिक अर्जुना ॥१२५॥
अंगीच्या सत्त्वगुणाकारण । आहे ते गोडपण । आणि स्नेहाच्याच कारण । रसाळ ते ॥१२६॥
आकाराने बेढब नसतात । हाताला मऊ लागतात । आणि स्वादिष्ट बा असतात । चवीला अर्जुना ॥१२७॥
रसाने ते परिपूर्ण । हातास नरम लागणं । आणि बा त्या उष्णतेनं । मुरलेले ते ॥१२८॥
लहान जरी आकार । हितावह ते फार । जसे गुरुमुखातील अक्षर । हितकारी ॥१२९॥
ऐसे गोड लागती तोंडाला । आणि सुखकर ते पोटाला । म्हणून आवडती सात्त्विकाला । पदार्थ सात्त्विक ॥१३०॥
ऐसी जयाची लक्षण । तेच बा सात्त्विक अन्न । करी शरीराचे रक्षण । सत्त्वाच्या कारण ॥१३१॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे सात्त्विक जे गुण । ते आहारातून घेणं । मग आयुष्य ते वाढणं । साहजिकच की ॥१३२॥
सूर्याच्या त्या कारण । जैसे दिवसाचं वाढणं । तैसे सत्त्वगुणी अन्न । पोषक अर्जुना ॥१३३॥
शरीर मनाच्या बळास । सात्त्विक आहार खास । आळा त्या रोगराईस । घालतसे तो ॥१३४॥
ऐसे सात्त्विक आहाराकारणे । देही आरोग्य नांदणे । भाग्यच ते उजळणे । देहाचे अर्जुना ॥१३५॥
मग सुखाचे देणे-घेणे । सहजचि बा ते होणे । ऐसे आनंद तो वाढणे । आपोआप अर्जुना ॥१३६॥
ऐसा सात्त्विक आहार । शरीर मनास बा हितकर । भवचक्राच्या जाण्या पार । उपयोगी अर्जुना ॥१३७॥
आता त्या रजोगुणाते । कोणते अन्न आवडते । अर्जुना करतो कथन ते । तुजसी आता ॥१३८॥
जे जीव नाही घेत । पण विषाहून कडवट । आणि आम्लासारखी आंबट । चव ज्याची ॥१३९॥
जितके कणकेस लागते पाणी । तितकेच मीठ टाकूनि । दुसऱ्याही रसांची मेळणी । जेथे आहे ॥१४०॥
जास्त खारट अन्न । रजोगुणी पुरुषा आवडणं । अन्न उष्ण सेवनं । सवय त्याची ॥१४१॥
वाफेचिया त्या संगे । वातीही लावल्या लागे । तैसे अन्न उष्ण मागे । राजसी तो ॥१४२॥
जिने दगडाही फोडणं । ऐसी पहार ती कठीण । तैसे तिखट बा खाणं । सवय त्याची ॥१४३॥
अन्न राखेहून कोरडे । चटकदार ते आवडे । गोड पदार्थ नावडे । तयांना अर्जुना ॥१४४॥
घाईत अन्न खाणे । खाताना दात वाजवणे । भराभर ते गिळणे । सवय त्यांची ॥१४५॥
तयाचं अन्न झणझणीत । तिखट मसाल्याचं असतं । घामाच्या धारा वाहतात । खाताना त्यांच्या ॥१४६॥
जे आगीसही मागे टाकते । ऐसे खाणे अन्न ते । ही सवयच असते । राजसाची ॥१४७॥
ऐसे तोंडाच्या कारण । तयाने वेडावून जाणं । आणि आग ती गिळणं । अन्नाच्या मिषे ॥१४८॥
मग ऐसा दाह सुटे । शरीर मना शांतता न वाटे । पाणी पिणे घटाघट ते । सवय त्यांची ॥१४९॥
हा कैसा बा आहार । व्याधींचा जो बाजार । रोग उठती अपार । तयाच्या शरीरी ॥१५०॥
ऐसे राजसी आहाराकारण । अनेक रोगांचे प्रकटन । केवळ दु:खच भोगणं । नशिबी तयाच्या ॥१५१॥
ऐसी बा ती लक्षण । प्रकटती राजसी आहाराकारण । घे नीट अंतरी उमजून । अर्जुना तू ॥१५२॥
आता ऐक तामसी आहार । कैसा तयाचा प्रकार । ऐकून किळस ती येणार । अर्जुना तुला ॥१५३॥
आंबलेले उष्ट अन्न । तमोगुण्या ते आवडणं । जसे म्हशीला आंबोण । आवडते अर्जुना ॥१५४॥
शिळे वा कालचे अन्न । तयाने खुशाल खाणं । शिळे अन्न आवडणं । खूण त्यांची ॥१५५॥
अन्न ते करपलेले । वा अर्धवट उकडलेले । नसे जे नीट भाजलेले । आवडते तया ॥१५६॥
अन्न नीट शिजलेले । जे चवीस नाही आले । ते क्वचितच तया लाभले । नशिबाच्या कारण ॥१५७॥
जर काही दैवानं । सुग्रास अन्न तया लाभणं । न सुटता अन्ना घाण । खाईच ना वाघाप्रमाणे ॥१५८॥
अन्न ते आंबलेले । नि स्वादहीन झालेलं । जे असे बा सडलेलं । आवडे तया ॥१५९॥
जसं मुलांनी अन्न चिवडणं । वा एकाच ताटात जेवणं । तैसेच आवडे भोजन । तयाला अर्जुना ॥१६०॥
ऐसे करता घाणेरडे जेवण । म्हणे सुंदर झाले भोजन । तरीही तृप्ती न होणं । तयाची अर्जुना ॥१६१॥
मग चमत्कार बा पाहे । निषेध जयाचा आहे । ऐसे पदार्थ तो खाये । आवडीने ॥१६२॥
मदिरा ती सेवन । मांसाहार बा करणं ।मग वासना त्या वाढणं । तामसी अर्जुना ॥१६३॥
ऐसे करता बा भोजन । तैसेच फळ प्राप्त होणं । लागेच ना एक क्षण । तयासी अर्जुना ॥१६४॥
ऐसी तामसी त्या भोजनी । अपवित्र ती करणी । मग पापाचा तो धनी । होतसे अर्जुना ॥१६५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

शिळे खाल्ल्याकारण। तयाचं पोट ते दुखणं। भयंकर यातना भोगणं। नशीब त्याचे ॥१६६॥
शिरच्छेद तो होताना। वा आगीत बा शिरताना। जैशा होती वेदना। त्या भोगणे तयाने ॥१६७॥
ऐसे तामसी ते अन्न। नाही तामसाहून भिन्न। हेच तू बा जाणं। अर्जुना माझ्या ॥१६८॥
ऐसे त्या आहाराप्रमाणं। यज्ञही त्रिविध असणं। तेही घे तू जाणून। अर्जुना आता ॥१६९॥
या त्रिविध यज्ञात। जो असे बा विख्यात। तो यज्ञ असे सांगत। सात्त्विक मी अर्जुना ॥१७०॥
जैसे पतिव्रतेचे मन। एका प्रिय पतीवाचून। इतरांची वासना नसणं। तैसे अर्जुना ॥१७१॥
एकरूप होता सागरात। नदी पुढे नाहीच बा जात। तैसे बा स्वस्वरूपात। रूचि तयांना ॥१७२॥
तैसे त्या स्वहिताकारण। करून चित्तवृत्तींचे विसर्जन। अहंकार तो विरू देणं। तयांनी अर्जुना ॥१७३॥
जैसे सापडल्या झाडाचे मूळ। सरणे माघारी नेणे जळ। जिरून जाई ते केवळ। मुळाच्याच ठायी ॥१७४॥
तैसे फलेच्छा सोडून। यज्ञाठायी देह मन अर्पून। अहंकाराचे बा विसर्जन। करती ते अर्जुना ॥१७५॥
त्या स्वस्वरूपावाचून। मनी काहीच इच्छा नसणं। ऐसे विरक्त ते होणं। यज्ञ अर्जुना ॥१७६॥
आरशाच्या त्या सहाय्यानं। आपले रूप पहाणं। वा पहाणे ते रत्न। प्रकाशात जसे ॥१७७॥
जसा सूर्य तो उगवणं। मग मार्ग स्पष्ट दिसणं। तैसे वेदांचे मार्गदर्शन। कल्याणकारी ॥१७८॥
यज्ञाची सामग्री मिळवून। कुंड मंडप ते मांडून। व्यवस्था यज्ञाची करणं। तयांनी अर्जुना ॥१७९॥
जैसे ते टापटिपीने। अंगावर अलंकार घालणे। तैसे सर्व गोष्टी मांडणे। नीट तयांनी ॥१८०॥
काय करू तयाचे वर्णन। जैसे त्या यजमान रुपानं। यज्ञ विद्येचे अवतरण। झाले अर्जुना ॥१८१॥
ऐसा परिपूर्ण सांगोपांग। अर्जुना बा यज्ञयाग। फल आकांक्षेचा तो लाग। नाही तया ॥१८२॥
प्रतिपाळ जैसा तुळशीचा। हेतू न ठेवता फल छायेचा। यज्ञ करणे त्या प्रकारचा। कल्याण अर्जुना ॥१८३॥
ऐसे ते फलइच्छेवीण। यज्ञाचे जे आयोजन। तोच यज्ञ बा जाण। सात्त्विक अर्जुना ॥१८४॥
आता यज्ञ तो करणे। अर्जुना दुसऱ्याच त्या कारणे। जैसे राजास ते बोलावणे। श्राद्धासाठी ॥१८५॥
राजा जर घरी येईल। खूप फायदा बा होईल। आपली कीर्ती ती वाढेल। जनामाजी ॥१८६॥
ऐसा हेतू मनी धरून। यज्ञ तो करणं। स्वर्ग सुखाच्या इच्छेनं। राजस तो ॥१८७॥
स्वार्थाच्या त्या हेतूनं। व्हावया आपुले मोठेपण। यज्ञ जो होतो संपन्न। तो राजसी अर्जुना ॥१८८॥
पशुपक्ष्यांच्या लग्नाते। मूळ कामवासनाच असते। तैसे मूळ तामसी यज्ञा ते। वासनाच अर्जुना ॥१८९॥
वाऱ्यास का मार्ग लागणे। की करणे मुहूर्त पुसणे। वा आगीने का पहाणे। योग्य अयोग्य कधी ॥१९०॥
तामसाचिये यज्ञे। विधीविधान ते नसणे। म्हणूनच तयासी म्हणे। तामसी मी ॥१९१॥
नाही योग्य अयोग्याची चाड। न येती मंत्रादिक आड। माशी ती घालते तोंड। कोठेही जशी ॥१९२॥
वैराग्याच्या त्या कारण। ब्राह्मणांनी यज्ञात न जाणे। ती अग्नीस मदत होणे। वादळाची जशी ॥१९३॥
तैसे वायाचि सर्वस्व वेचे। मुख न देखता श्रद्धेचे। घर लुटले जाते निपुत्रिकाचे। तैसे अर्जुना ॥१९४॥
ऐसा जो यज्ञाचा भास। तया नाम बा तामस। ऐसे म्हणाला श्रीनिवास। लक्ष्मीचा तेथे ॥१९५॥
जसे गंगेचे एक पाणी। नेता वेगवेगळ्या मार्गांनी। एक मळ दुजा आणि। शुद्धत्व जैसे ॥१९६॥
तैसे तपाचे प्रकार तीन। एक पापासी कारण। दुज्या कारणे ते उद्धरणं। घडे बा अर्जुना ॥१९७॥
तपाचे ते भेद तीन। अर्जुना तू घे जाणून। तप कशासी बा म्हणणं। ऐक ते आधी ॥१९८॥
तप कशाला म्हणणं। घे आधी तू ऐकून। मग प्रकार तयाचे भिन्न। सांगेन मी तुजला ॥१९९॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तप जे का सम्यक । तेही त्रिविध तू ऐक । शारीरिक मानसिक वाचिक । प्रकार त्यांचे ॥२००॥
आता या तिहींमाझारी । शारिरीक ते अवधारी । शंभू वा श्रीहरी । जो आवडे जीवा ॥२०१॥
आवडत्या देवतेच्या मंदिरात । जाणे तया आवडतं । सकाळ संध्याकाळ असे जात । मंदिरामाजी ॥२०२॥
देवास शृंगार करणे । गंधपुष्प अर्पणे । मंदिरात सेवा करणे । आवडे तया ॥२०३॥
लिंग वा मूर्ती पहाणे । मग दंडवत घालणे । जैसे काठीचे पडणे । उभ्यानेच अर्जुना ॥२०४॥
सदाचाराच्या कारण । जयाना मान बा असणं । सेवा तयांची करणं । स्वभाव त्याचा ॥२०५॥
जे रोगांनी असती पिडले । वा संकटांनी जे गांजले । तयाच्या मदतीस धावले । हे तापसी अर्जुना ॥२०६॥
श्रेष्ठ सर्व तीर्थाहून । जे मायबापच असणं । तयांची सेवा करणं । धर्म त्यांचा ॥२०७॥
जो सोडवी संसारातून । करून ते ज्ञानदान । त्यागुरुसी सदैव भजणं । आवडे तया ॥२०८॥
स्वधर्माच्या त्या आगीत । संस्कार ते जाळत । अहंकार तो विसर्जित । करती ते अर्जुना ॥२०९॥
सर्वत्र आत्मतत्त्व जाणून । सर्वांवर प्रेम करणं । भोगांपासून दूर रहाणं । स्वभाव त्यांचा ॥२१०॥
जन्माच्या त्या प्रसंगात । स्त्रीदेहाचा स्पर्श असे होत । पण जीवनभर असे पाळत । सोवळे तो अर्जुना ॥२११॥
गवताच्याही ठिकाणी । आत्मतत्त्व जाणुनी । भेदाभेदाची सांडणी । करती ते अर्जुना ॥२१२॥
ऐशा त्या प्रकाराने । शुद्ध जीवन जगणे । तया शरीरिक तप म्हणणे । अर्जुना माझ्या ॥२१३॥
पार्था समस्तही हे करणे । देहाचे नि प्रधानपणे । म्हणून ययाते म्हणणे । शारीरिक अर्जुना ॥२१४॥
ऐसे शारीरिक जे तप । तयाचे दाविले रूप । आता तू ऐक । वाचिक ते ॥२१५॥
जैसे लोखंडाचे असणे । तयासी करणे सोने । जैसे त्या परीसाने । तैसे अर्जुना ॥२१६॥
कोणासही न दुखावणे । सर्वांसी प्रेमाने बोलणे । ऐसे सुखकर वागणे । तयाचे अर्जुना ॥२१७॥
पाणी पिकास देणे । पण गवतासही ते लाभणे । तैसे तयाचे बोलणे । हितकारी सर्वांना ॥२१८॥
अमृताची गंगा भेटता । लाभते प्राणास ती अमरता । आणि स्नान ते करता । पापक्षालन ॥२१९॥
तैसे अज्ञान फिटणे । आपले अनादित्व जाणणे । अमरत्व ते जाणणे । वेदातले आपल्या ॥२२०॥
जर कोणी काही पुसणे । मगच बा ते बोलणे । नाही तर राहणे । वेदात मग्न ॥२२१॥
तिन्ही वेद जाणून । तयांचे पारायण करणं । वेद उच्चार करणं । तयाने सदैव ॥२२२॥
ना तरी एखादे नाव । शैव वा वैष्णव । वाचे वसणे सदैव । वाचिक तप अर्जुना ॥२२३॥
आता तप जे मानसिक । तेही सांगतो ऐक । म्हणे लोकनाथनायक । अर्जुनासी तेथे ॥२२४॥
सोडावे तरंगांनी सरोवरास । वा मेघांनी त्या आकाशास । अथवा सापांनी चंदनवनास । तैसे अर्जुना ॥२२५॥
कलांनी सोडावे चंद्रास । वा चिंतानी त्या राजास । वा घुसळणे थांबवावे सागरास । मंदराने जैसे ॥२२६॥
तैसे विकल्प ते सांडता । मन स्थिर होता । प्रकटते ती स्वरूपता । अंतरंगी अर्जुना ॥२२७॥
उष्णतेशिवाय प्रकाश । जडतेवीण तो रस । पोकळीवीण ते अवकाश । तैसे अर्जुना ॥२२८॥
प्रकटता ते आत्मज्ञान । संपून जाते मन । मग विचारांची ती भणभण । संपते अर्जुना ॥२२९॥
जैसे चंद्रबिंब कलंकहीन । प्रकाशते मग परिपूर्ण । तैसे स्वार्थरहित मन । उदया येते ॥२३०॥
थांबते कळ जीवभावाची । धावाधांव थांबते मनाची । जेथे पहाट आत्मबोधाची । उगवली अर्जुना ॥२३१॥
म्हणोनि विचारावया शास्त्र । राहटावे जे वक्र । ते वाचेचेही सूत्र । हाती न धरी ॥१३२॥
होता ते आत्मज्ञान । संपते मनाचे मनपण । मीठ जातं जसं विरघळून । पाण्यामाजी ॥२३३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

न उठतीच ते भाव । जे इंद्रियामागे घेती धांव । विषयांची ती हाव । संपते तेथे ॥२३४॥
म्हणून ती मानसी । भावशुद्धिच जी अपैसी । रोम शुचि ती जैसी । तळहातासी अर्जुना ॥२३५॥
प्राप्त होणे ही अवस्था । तीच मानसिक तपाची पूर्णता । मनाची ती अगतिकता । संपते तेथे ॥२३६॥
परि ते असे जाण । मानस तपाचे लक्षण । देव म्हणे संपूर्ण । सांगितले तुजला ॥२३७॥
देह वाचा चित्त । जे तपाचे त्रिविधत्व । तयांचे ते महत्त्व । ऐकलेस तू ॥२३८॥
त्रिगुणाच्या कारण । जे तपाचे प्रकार तीन । तेही घे तू ऐकून । अर्जुना आता ॥२३९॥
फळाची आशा सोडणे । त्रिविध तप ते करणे । तयासीच तप म्हणणे । सात्त्विक गा अर्जुना ॥२४०॥
शुद्ध सात्त्विक वृत्तीने । आचरणे आस्तिकभावाने । तयासीच मी म्हणे । सात्त्विक तप अर्जुना ॥२४१॥
द्वैत ते मांडणे । आणि तप ते करणे । मोठेपण बा वाढवणे । राजसी अर्जुना ॥२४२॥
मानाची आशा धरून । असो सभा वा भोजन । तप ते करणं । राजसीच की ॥२४३॥
विश्वाने आपली स्तुती करणे । लोकांनी घरी खेटे घालणे । ऐशाच त्या उद्देशाने । जे केले अर्जुना ॥२४४॥
सर्व तो बहुमान । आपल्यालाच मिळावा म्हणून । तयांनी प्रयत्न करणं । सदैव अर्जुना ॥२४५॥
जसे एखाद्या विद्रूपाने । स्वत:स सुंदर साज घालणे । तैसे बुद्धि वाणी शृंगारणे । उद्देश तपाचा ॥२४६॥
ऐसी धन मानाची आस । तयासाठी करणे सायास । तेचि तप राजस । आहे बा अर्जुना ॥२४७॥
पहा रोगी जे जहाले । जनावर न दुभे ना व्याले । जैसे उभे शेत चारीले । तयांनी अर्जुना ॥२४८॥
तैसे आवडंबर करून । तप जे आचरणं । ते निष्फळच बा जाण । अर्जुना माझ्या ॥२४९॥
तयाचि निष्फळता जाणून । देत असे तो सोडून । मन तयाचं स्थिर असणं । अशक्यच की ॥२५०॥
जसे ढग अकाली येणं । आणि मोठा गडगडाट करणं । पण क्षणिक तयाचं टिकणं । तैसे बा अर्जुना ॥२५१॥
ऐसे जे राजस तप ते । अर्जुना निष्फळचि असते । आचरणी नच उतरते । राजसी कधी ॥२५२॥
आता तामस तपाचे प्रकरण । घे अर्जुना ऐकून । स्वर्ग इह दोन्ही दुरावणं । जयाच्या कारण ॥२५३॥
कळस जो मूर्खपणाचा । छळ करणे शरीराचा । विचार त्या तामसी तपाचा । आता करू अर्जुना ॥२५४॥
शरीरास वैरी मानून । अग्नीत ते जाळणं । शरीरास त्रास देणं । उद्देश या तपाचा ॥२५५॥
डोक्यावर गुग्गुळ जाळणे । पाठीला गळ टोचणे । आगीत होरपळून घेणे । तप तामसी अर्जुना ॥२५६॥
श्वासोच्छ्वास रोखणे । उगाच उपवास करणे । उलटे टांगून घेणे । धुरात बा अर्जुना ॥२५७॥
जेथे अति थंडी असणे । तेथे पाण्यात उभे राहणे । आपल्या अंगाचे तोडणे । लचके अर्जुना ॥२५८॥
ऐसे दुसऱ्याच्या नाशाकारण । हेतू अशुद्ध ठेवून । स्वत:च नाश पावणं । ते तामसी अर्जुना ॥२५९॥
जैसे आपल्याच वजनानं । दगडाने उतारावर गडगडणं । आणि तुकडे-तुकडे होणं । आपोआप ॥२६०॥
तैसे स्वत:स त्रास देऊन । तप ते करणं । मनी दुष्ट हेतू असणं । तप तामसी अर्जुना ॥२६१॥
ऐशा भयंकर कृतीनं । तप जे होते निष्पन्न । तेच तामसी म्हणून । प्रसिद्ध अर्जुना ॥२६२॥
ऐसे प्रकार तपाचे तीन । सांगितले मी समजावून । जे बा गुण विभाजनाकारण । ऐकलेस तू ॥२६३॥
आता प्रसंग आला म्हणून । दानाचे प्रकार तीन । तेही सांगतो समजावून । अर्जुना तुला ॥२६४॥
गुणांच्याच त्या कारण । होतात दानाचे प्रकार तीन । प्रथम सात्त्विक दान । ऐकावेस तू ॥२६५॥
करून ते स्वधर्माचरण । द्रव्य जे प्राप्त होणं । ते दुसऱ्यास बा देणं । सन्मान करून ॥२६६॥
प्राप्ती होणे उत्तम बियांची । पण उणीव दमदार शेतीची । तैसीच या दानाची । गोष्ट आहे ॥२६७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

हिरा तो प्राप्त होणे । पण कोंदणासाठी सोनेच नसणे । जसे अवयवाचे नसणे । घालण्या दागिने ॥२६८॥
सण प्रियजन संपत्ती । जेधवा एकत्र येती । तेथेच भाग्याची उन्नती । समजणे अर्जुना ॥२६९॥
दानाच्या मदतीस तो । जेव्हा सत्त्वगुण येतो । तेव्हाच योग जुळून येतो । ऐसा बा अर्जुना ॥२७०॥
योग्य दान घडण्याला । जावे काशी वा कुरुक्षेत्राला । किंवा तैशाच त्या क्षेत्राला । गेले पाहिजे ॥२७१॥
पहावा रविचंद्रराहूमेळ । जो आहे पुण्यकाळ । वा मुहूर्त तैसाच निर्मळ । पहावा अर्जुना ॥२७२॥
त्या काळी तिये देशी । शोधावी व्यक्ती पात्र ऐसी । जी शुद्धीची बा जैसी । मूर्ती अर्जुना ॥२७३॥
जया अंगी सदाचार । शास्त्रांचे ज्ञान अपार । पवित्रतेचा जो सागर । शोधावा अर्जुना ॥२७४॥
मग तया ठायी धन । अपूर्ण ते संपूर्ण । करावे तयासी ते दान । नम्रपणे ॥२७५॥
जयाचे तया देणे । उतराई ते होणे । जसे राजास सेवकाने । नमावे अर्जुना ॥२७६॥
तैसे निष्काम होऊन । धन धान्य अर्पून । फलइच्छा ती त्यागून । करावे दान ॥२७७॥
जयासी आहे दान देणे । तया ऐसाच बा शोधणे । जयाकडून दानाचे फेडणे । न घडावे कधी ॥२७८॥
साद घातलिया आकाशा । प्रतिध्वनी येत नाही जैसा । दानाचा प्रसंग तैसा । न आठवावा मनी ॥२७९॥
जैसा पाणथळ जागेवर । चेंडू तो आपटल्यावर । पुन्हा उधळत नाही वर । तैसे ते अर्जुना ॥२८०॥
तैसे दान बा देऊन । मनी न यावे ते स्मरण । मन निष्काम असणं । सूत्र आहे ॥२८१॥
न ठेवता दातृत्वाचे भान । जे केले अर्जुना दान । तेच सात्त्विक म्हणून । प्रसिद्ध आहे ॥२८२॥
ऐसे सर्व योग जुळून । घडते अर्जुना जे दान । मगच जीवाचे कल्याण । घडतसे अर्जुना ॥२८३॥
देश काळ आणि स्थान । यांचा योग तो घडून । होतसे ऐसे जे दान । ते सात्त्विक अर्जुना ॥२८४॥
जसे दुधाच्या त्या आशेनं । गाईस चारा घालणं । जे हेतूच्या कारण । ते राजसी अर्जुना ॥२८५॥
आहेरावर लक्ष ठेवून । सोयऱ्यांना आमंत्रण देणं । जसे वाण ते पाठवणं । परतीच्या आशेनं ॥२८६॥
व्याज ते घेऊन । गरजूंना पैसे वाटणं । वा मोबदला घेऊन देणं । औषध जसं ॥२८७॥
जो आपल्या उपयोगी येईन । तयासी ते दान देणं । करणे दान हेतू ठेवून । ते राजस अर्जुना ॥२८८॥
अथवा भेटता सात्त्विक ब्राह्मण । जो पुढे उपयोगी नसणं । तया कसे देतो दान । ऐक अर्जुना ॥२८९॥
कवडी एक दान करून । सर्व पिढ्यांचे प्रायश्चित्त सोडणं । मनी संकल्प तो धरून । हातावर त्याच्या ॥२९०॥
अनेक गोष्टी त्या इच्छिणे । स्वर्गसुखही मनसोक्त मागणे । परि दान अत्यल्प देणे । तैसे अर्जुना ॥२९१॥
किंचितच देणे दान । आणि दिल्यावर पश्चात्ताप वाटणं । जसे चोरांनी नेले लुटून । सर्वस्व त्याचे ॥२९२॥
ऐशा त्या भावनेनं । जे दिले जाते दान । तेच राजस म्हणून । प्रसिद्ध आहे ॥२९३॥
नास्तिकांच्या वस्तीत । वा अपवित्र त्या स्थानात । जो दान असे देत । ते तामसी अर्जुना ॥२९४॥
लूटपाट बा करून । जे आणलं असे चोरून । ते देणे जे दान । ते तामसी अर्जुना ॥२९५॥
भाट आणि चेटक्यांना । वेश्या आणि गुलामांना । देणे तया जे अपात्र दाना । ते तामसी अर्जुना ॥२९६॥
रूप-लावण्याला भुलून । डोळे ते धुंद होऊन । गाणे ऐकत देणे दान । ते तामसी अर्जुना ॥२९७॥
फूल अत्तराच्या सुवासानं । बेधुंद ते होऊन । वासनेस्तव करणे दान । ते तामसी अर्जुना ॥२९८॥
दरोडे ते घालून । मिळविले जे धन । तयाने अन्नछत्र चालवणं । ते तामसी अर्जुना ॥२९९॥
जे काही ऐसे देणे । तया मी तामसी म्हणे । जे घडते दैवयोगाने । ऐक अर्जुना आता ॥३००॥
किड्यांनी लाकूड कोरणं । आणि तेथे अक्षर उमटणं । वा कावळा तो सापडणं । टाळीत जैसे ॥३०१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पात्र भिक्षुक आला । तोही बा भुकेला । द्रव्यास याच्या भाळला । तैसा बा अर्जुना ॥३०२॥
श्रद्धा नसे अंत:करणात । तया नमस्कारही नाही करत । आणि नसे तो आदरसत्कारत । तयाला अर्जुना ॥३०३॥
आलेल्यास न देई पाट । तेथे गंधाक्षतांची काय गोष्ट । ऐसा स्वभावाने वाईट । तामसी अर्जुना ॥३०४॥
जरा थोडेसे काही देणे । पण खूप मारणे टोमणे । ऐसा खाष्ट स्वभावाने । तामसी अर्जुना ॥३०५॥
जसे थोडे पैसे त्या सावकारास । देऊन लावणे बा वाटेस । तैसा व्यवहार हा तामस । करतसे अर्जुना ॥३०६॥
खूप झाले हे सांगणं । उगाच तयाविषयी बोलणं । ऐसे असे जे दान । ते तामस अर्जुना ॥३०७॥
ऐसे केले मी कथन । दानांचे प्रकार तीन । आणि तयांची ती लक्षणं । सांगितली तुजला ॥३०८॥
अर्जुना तुला बा वाटेन । सत्त्वाकारण भवबंधन तुटणं । मग रजतमाचे वर्णन । केले कशाला ॥३०९॥
योग्य अशी शंका येणं । पण आवश्यक रजतमाची जाण । म्हणून तयांचे वर्णन । केले मी अर्जुना ॥३१०॥
जसे समंधास पिटाळल्यावाचून । न प्राप्त होते गुप्त धन । वा धूर तो सोसल्यावीण । न पेटते चूल ॥३११॥
रजतमाच्या अंधारा पलीकडे । आहे सत्त्वगुणाचे राजवाडे । म्हणून त्रिगुणाचे पोवाडे । गाणे झाले ॥३१२॥
आम्ही श्रद्धादि दानात । सांगितल्या समस्त क्रियाजात । त्या असती अर्जुना व्याप्त । तिहीगुणी ॥३१३॥
तू जाणतोस ते तिन्ही । आणि तयांची ती कहाणी । परि सत्त्व दावावया दोन्ही । बोललो रजतम ॥३१४॥
जे दोहीमाजी तिजे असे । ते दोन्ही सांडताचि दिसे । दिवसरात्र त्यागे जैसे । संध्यारूप ॥३१५॥
तैसे रजतम विनाशे । तिजे जे उरत दिसे । ते सत्त्व हे आपैसे । भावासी ये ॥३१६॥
एवं दावावया सत्त्व तुज । निरूपले तम आणि रज । दे दोघेही सांडुनि आज । सत्त्वासाठी ॥३१७॥
सात्त्विक ते होता । व्रत ध्यान उपवास करता । मजसी ती एकरूपता । अनुभवा येते ॥३१८॥
सूर्याने करता प्रकाशित । काय नाही दिसत । तैसे सात्त्विका असे होत । प्राप्ती सगळी ॥३१९॥
पाहिजे ती गोष्ट । सत्त्वाकारणे होते प्राप्त । मोक्षाचेही द्वार असे उघडत । सत्त्वाकारणे ॥३२०॥
ऐसी निराळी गोष्ट सत्त्वाची । प्राप्ती होते मोक्षाची । पण बोळवण रजतमाची । जाहली पाहिजे ॥३२१॥
शुद्ध जरी असलं सोनं । त्यावर राजमुद्रा उठल्यावीण । अर्जुना ते चलन म्हणून । उपयोगी नाही ॥३२२॥
थंड सात्त्विक निर्मळ स्थान । पण नसता तेथे ज्ञानी जन । तेथे तीर्थाचे पवित्रपण । प्रकटेच ना ॥३२३॥
नदी असो कितीही लहान । पण महानदीशी संगमावीण । होते का सागरासी मीलन । तिचे कधी ॥३२४॥
तैसे सात्विक कर्माकारण । होते मोक्षाचे प्रकटन । सर्व अडथळे दूर होणं । सत्त्वाकारणे ॥३२५॥
हे पडल्यावर काना । उत्सुकता अंतरी मावेना । म्हणून अर्जुन म्हणाला कृष्णा । सांगा कैसे ॥३२६॥
तेव्हा म्हणाले भगवान । सात्त्विका कैसे मोक्षपण । तयाचे ते स्पष्टीकरण । ऐकावे आता ॥३२७॥
तरी अनादि परब्रह्म । जे जगदादि विश्रामधाम । तयाचे एक नाम । ॐ तत्सत् असे ॥३२८॥
नाव नाही परब्रह्माला । आणि जातही नाही तयाला । पण श्रुतींनी तया वर्णायला । खूण केली ॥३२९॥
उपजलेल्या त्या बालकासी । नाव नाही तयापासी । ठेवल्या त्या नावासी । ओ देत उठी ॥३३०॥
कष्टले जे संसारशिणे । देवासी घालता गाऱ्हाणे । तया देवाने ओ देणे । नाम तैसे ॥३३१॥
ब्रह्माचा अबोला फिटावा । अद्वैत्ये देव भेटावा । ऐसा मंत्र तो बरवा । ॐ तत्सत् ॥३३२॥
या मंत्राच्या कारण । ब्रह्ममयतेचं प्रकटणं । पण चारी वाचांचे मौन । सूत्र आहे ॥३३३॥
ऐसे वेदांच्या शिखरी । आणि उपनिषदार्थनगरी । जे बैसले ब्रह्माच्या एकहारी । तयासीच कळे ॥३३४॥
ब्रह्मदेवाच्या हातून । घडले सृष्टीचे प्रकटन । ते या मंत्राच्याच उच्चाराकारण । अर्जुना माझ्या ॥३३५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

होण्यापूर्वी सृष्टी निर्माण । ब्रह्मा राहत होता एकट्यानं । इतर कशाचेही प्रकटन । नव्हते तेव्हा ॥३३६॥
नव्हता तो ईश्वरासी ओळखत । सृष्टीही निर्माण नव्हती होत । मंत्रानेच झाला शक्तिपात । तयाठायी ॥३३७॥
मंत्राचे ध्यान करता । तीन शब्द ते जपता । सृष्टीसृजनाची योग्यता । आली तया ॥३३८॥
तेधवा रचिले लोक तीन । आणि वेदांचे शासन । निर्वाहाचे ते साधन । यज्ञ दिले ॥३३९॥
आणि मग त्यानंतर । निर्मिले लोक ते अपार । म्हणून त्रिभुवनाचा तो व्यवहार । चालतो येथे ॥३४०॥
ज्या नाममंत्राकारण । ब्रह्माठायी अपार विश्व प्रकटन । त्या नामाचे बा वर्णन । ऐक तू आता ॥३४१॥
पहिला शब्द तो ओंकार । दुजा शब्द तत्कार । तिजा तो सत्कार । आहे बा अर्जुना ॥३४२॥
ॐ तत्सत् । ऐसा उच्चार तो करत । जीव होतसे बा मुक्त । जीवभावातून अर्जुना ॥३४३॥
या नामासी होऊन एक । जो कर्म करतो सात्त्विक । तो कैवल्याचाच पाईक । आहे अर्जुना ॥३४४॥
जैसे कापुराचे दागिने । प्राप्त झाले दैवाने । पण अंतरी न जाणे । ल्यावे कैसे ॥३४५॥
तैसे घेतले ब्रह्मनाम । मनी आवडते सत्कर्म । परि न जाणता ब्रह्ममयतेचे वर्म । निरुपयोगी अर्जुना ॥३४६॥
घरी येता ते साधुजन । तयाचा आदरसत्कार न करणं । मग असलेलंही पुण्य जाणं । तैसे अर्जुना ॥३४७॥
जसे अंगावर न घालता दागिने । गळ्यात ते बांधून हिंडणे । तैसा या ब्रह्मज्ञाने । उपयोग काय ॥३४८॥
तैसे तोंडी ब्रह्मनाम । आवडते सात्त्विक कर्म । पण ब्रह्ममयतेवीण काम । विफल होई ॥३४९॥
अगा अन्न आणि भूक । जवळ असे परि देख । जेवणे न जाणता बालक । उपाशीच राही ॥३५०॥
जसे आग तेल वात । तिन्हीही त्या गोष्टी प्राप्त । पण दिवा लावण्याची पद्धत । माहिती पाहिजे ॥३५१॥
तैसे कर्माचे ते होणे । मंत्राचेही बा आठवणे । परि आघवे ते ब्रह्मज्ञानाविणे । व्यर्थ अर्जुना ॥३५२॥
म्हणोनि हे त्रिशब्दात्मक । जे हे परब्रह्म नाम एक । त्या ब्रह्ममयतेचे ऐक । स्वरूप आता ॥३५३॥
अर्जुना या तीन अक्षरांत । आहे आरंभ मध्य अंत । हे विश्व असे होत जात । या तिघांचेकारणे ॥३५४॥
या तिघांनाही जाणणं । तेच अर्जुना ब्रह्मज्ञान । ब्रह्ममयता अंतरी प्रकटणं । ज्ञान आहे ॥३५५॥
होण्या ब्रह्ममयतेचे प्रकटन । तयांनी यज्ञादिक करणं । शास्त्रांना ते अभ्यासून । पावती ज्ञाना ॥३५६॥
ऐसा तो ओंकार । जो ध्यानात होतो गोचर । जाता मनइंद्रियांच्या पार । ज्ञान त्याचे ॥३५७॥
ऐसे बा ध्यानात । ब्रह्ममयता ती अनुभवत । कर्म करण्यास मग निघतात । ज्ञानी अर्जुना ॥३५८॥
दिवा घेणे अंधारात । वा बलाढ्याची सोबत रानात । तैसे ब्रह्मज्ञानाच्या संगतीत । कर्म यांचे ॥३५९॥
योग्य उद्देश मनी धरत । द्रव्य धन ते अर्पितात । आणि आहुति त्या अग्नीत । टाकती अर्जुना ॥३६०॥
शास्त्रोक्त त्या पद्धतीने । तयांनी यज्ञ बा करणे । प्रतीकात्मक कर्म निरसणे । आहे ते अर्जुना ॥३६१॥
ऐसे यज्ञयाग करून । निष्काम तयांनी होणं । अंतरी उपाधी त्यागणं । सूत्र आहे ॥३६२॥
उचित त्या मार्गानं । द्रव्य धन कमावून । सत्पात्री दान देणं । कर्म त्यांचे ॥३६३॥
एकांत तो पाळून । चांद्रव्रत करून । शरीर क्षीण करणं । तप त्यांचे ॥३६४॥
यज्ञ दान तप करून । निष्काम ते होऊन । तोडती ते बंधन । भवाचे अर्जुना ॥३६५॥
जमिनीवर जड असे वाटत । ती होडी पाण्यात असे तारत । तैसे बंधन असे कटत । नामाने अर्जुना ॥३६६॥
अशा या रीतीनं । यज्ञ तप दान करून । निष्काम ते होणं । सूत्र आहे ॥३६७॥
हे सर्व जे करणे । त्या ब्रह्ममयतेच्या कारणे । ब्रह्मालाच तत् शब्दाने । उल्लेखिले आहे ॥३६८॥
जे सर्वही जगापरौते । जे एक सर्वही जाणते । तेच तत् या शब्दाते । सामावले आहे ॥३६९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जे आहे चराचरांत । ते जाणुनिया अंतरात । मग ते उच्चार करतात । ॐ तत्सत् ॥३७०॥
ब्रह्मासी एकरूप होऊन । द्वैतभाव तो संपवून । भ्रमिक जे मीतूपण । संपवती ते ॥३७१॥
स्वयेचि होता ब्रह्म । विरते अहम्भावाचे कर्म । मी-पणाचा मग भ्रम । उरेचिना ॥३७२॥
ऐसे ओंकारे आदरीले । तत्कारे ते समर्पिले । तयांचे सर्व कर्म झाले । ब्रह्म अर्जुना ॥३७३॥
अनुभवले अंतरी ब्रह्मपण । मग राहे ब्रह्ममयतेचा अभिमान । ऐसे द्वैत सूक्ष्मरूपानं । शिल्लक राही ॥३७४॥
मीठ जरी पाण्यात विरे । पण क्षारता वेगळी उरे । तैसे कर्म ब्रह्माकारे । उरतेच की ॥३७५॥
जेथे उरते कर्मता । तेथे आहे संसारभयता । वेदात हे सर्वथा । वर्णिले आहे ॥३७६॥
विरण्या ब्रह्ममयतेचा अभिमान । केले सत् शब्दाचे प्रयोजन । जे केवल असणेपण । मी-पणावीण ॥३७७॥
जी ओंकाराची धून । तीच प्रसिद्ध तत् म्हणून । त्या दोहांचे वर्णन । ऐकलेस तू ॥३७८॥
ओम तत् कारण । जे होते सृष्टीचे प्रकटन । तेच सत् शब्दानं । वर्णिले आहे ॥३७९॥
सत् शब्द योजून । केले सृष्टीचे वर्णन । जे ब्रह्माचच असणं । आहे अर्जुना ॥३८०॥
ब्रह्मच प्रकटते सृष्टी होऊन । दृश्य स्थलकाल रुपानं । तरी ब्रह्माचे ब्रह्मपण । अखंडित राही ॥३८१॥
जे हे सृष्टीचे प्रकटन । ते ब्रह्माच्याच कारण । त्या ब्रह्माला अंतरी अनुभवणं । सूत्र आहे ॥३८२॥
मन समत्वासी पावता । अनुभवा येते ब्रह्ममयता । मग आपली विश्वात्मकता । उमजते अंतरी ॥३८३॥
ऐसे ते असणेपण । जे ब्रह्मभावावीण । ब्रह्माचाही अभिमान निरसणं । आवश्यक अर्जुना ॥३८४॥
ऐसा सत् शब्दाचा अर्थ । घ्यावा सर्वांनी लक्षात । भगवान असे सांगत । मी नाही अर्जुना ॥३८५॥
म्हणता हे माझे बोलणे । तेथे द्वैताचे प्रकटणे । म्हणून हे भगवंताचेच बोलणे । समजावे अर्जुना ॥३८६॥
आता आणिकही परि । सत् शब्द अवधारी । सात्त्विक कर्मा करी । शुद्ध जो अर्जुना ॥३८७॥
सत्कर्म ते करणं । पण काही कारणाकारण । ते कर्म होतसे हीन । अर्जुना माझ्या ॥३८८॥
जसे व्यंग असता पायात । अर्जुना चालता नाही येत । जसा रथ असे थांबत । चाकाच्या अभावी ॥३८९॥
तैसे ब्रह्माभिमानाकारण । ब्रह्ममयतेचा गर्व होऊन । कर्माचं ते असत् होणं । घडतसे अर्जुना ॥३९०॥
तेव्हा ओम तत्च्या मदतीला । सत् शब्द हा आला । मग ब्रह्मभावही निरसला । तेथे अर्जुना ॥३९१॥
असत्पण दूर करून । सत्भाव दृढ करून । ब्रह्माभिमान तो निरसणं । कार्य सत्चे ॥३९२॥
दिव्य औषधाच्याकारण । जसे जुनाट रोगाचं उच्चाटन । तैसे ब्रह्मभावाचं निरसणं । सत्च्या कारण ॥३९३॥
जर प्रमादाच्या कारण । कर्म जातसे चुकून । मग नको ते करणं । घडे तेथे ॥३९४॥
चालत्याचा मार्ग चुकतो । पारखीही भ्रमून जातो । तैसा प्रमाद घडतो । व्यवहारामाजी ॥३९५॥
अविचाराच्या कारण । नको ते करून बसणं । तेच बा कर्माचं दुष्कर्म होणं । अर्जुना माझ्या ॥३९६॥
सत्ची दृढ होता जाण । निरसून जातो ब्रह्माभिमान । ऐसे सत् शब्दाचे प्रयोजन । कल्याणकारी ॥३९७॥
लोह परिसाची गाठ पडणे । ओहोळ तो गंगेस मिळणे । जशी मृतावर वृष्टी होणे । अमृताची अर्जुना ॥३९८॥
ऐसे कर्म जे हीन । ते जातसे शुद्ध होऊन । म्हणून सत् शब्दाची जाण । महत्त्वाची अर्जुना ॥३९९॥
जया म्हणती ब्रह्म । अर्जुना तेच बा आहे नाम । जाणणे अंतरी हे वर्म । ज्ञान अर्जुना ॥४००॥
तैसे हे ॐ तत् सत् । जेथून विश्व असे प्रकाशत । अखिल ही दृश्यजात । ब्रह्म अर्जुना ॥४०१॥
ऐसे जे शुद्ध ठिकाण । तेच परब्रह्माचं असणं । तेच येथे नाम म्हणून । प्रसिद्ध आहे ॥४०२॥
जैसा आश्रय आकाशा । आकाशाचाच असे जैसा । आधार नामास तैसा । ब्रह्माचा अर्जुना ॥४०३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आकाशात त्या उगवून । सूर्यच करी सूर्याचं प्रकटन । तैसे विश्वाचे प्रकटन । नामाठायी ॥४०४॥

म्हणून तीन अक्षरी हे नाम । तेच आहे बा ब्रह्म । ते जाणण्या सर्व कर्म । करावे अर्जुना ॥४०५॥

यज्ञ अथवा दान । तपश्चर्या त्या गहन । त्या सर्वांसी करावे अर्पण । ब्रह्माला अर्जुना ॥४०६॥

परीसाचा स्पर्श होता । तेथे कैची अशुद्धता । तैसे कर्मे ब्रह्मासी अर्पिता । ब्रह्मचि होती ॥४०७॥

एकत्र येता समुद्रात । नद्या वेगळ्या नाही राहत । तैसे ब्रह्मार्पण कर्मात । उणे नाही ॥४०८॥

एवं पार्था तुजप्रती । सांगितली ब्रह्मा नामाची उपपत्ती । अंतरी जे ब्रह्म होती । ते धन्य अर्जुना ॥४०९॥

त्यातले एकेक अक्षर । सांगितले मी सविस्तर । वर्णन अतिसुंदर । ऐकलेस तू ॥४१०॥

ऐसे जे अप्रतिम । अर्जुना हे ब्रह्मनाम । समजले का तयाचे वर्म । अर्जुना तुला ॥४११॥

ऐसे ब्रह्मज्ञान ते होणं । तेचि बा श्रद्धेचे प्रकटन । सर्व बंधांचं मग तुटणं । अनिवार्य अर्जुना ॥४१२॥

निर्विकल्प  कर्म ते अनुसरून । होऊ द्यावे ब्रह्माचे प्रकटन । तयाचे वेदाचे अनुष्ठान । पूर्ण झाले ॥४१३॥

निर्विकल्प न रहाणे । इच्छायुक्त कर्म करणे । अहंकार तो वाढणे । अकल्याण अर्जुना ॥४१४॥

मनी इच्छा धरून । जरी केला अश्वमेध यज्ञ । वा अगणित जरी केले दान । ते व्यर्थ अर्जुना ॥४१५॥

जलाशयाचेनि नावे । समुद्रही बांधावे नवे । परि किंबहुना ते आघवे । वृथाचि अर्जुना ॥४१६॥

खडकावर पाऊस पडणे । राखेत आहुति टाकणे । ते आलिंगन बा देणे । सावलीस जसे ॥४१७॥

जसे आकाशावर वार करणे । अर्जुना ते वायाचि की जाणे । तैसे सविकल्प कर्म करणे । व्यर्थ अर्जुना ॥४१८॥

घाण्यात गोटे ते गाळणे । तेथे तेल कैसे बा मिळणे । तैसे मनी इच्छांचे असणे । व्यर्थ अर्जुना ॥४१९॥

गाठी बांधली खापरी । येथे अथवा पैलतीरी । ती जशी उपाशीच मारी । तैसे अर्जुना ॥४२०॥

अर्जुना ज्या कर्माच्याकारणे । ऐहिकही न लाभणे । तेथे पारलौकिक दुरावणे । अनिवार्यच की ॥४२१॥

उमजून करावे कर्माचरण । तरच प्रकटते ब्रह्मज्ञान । अन्यथा सर्व तो शिण । आहे अर्जुना ॥४२२॥

जयाचे त्या कारणे । घडे पापाचे संपणे । ऐसे सांगितले भगवंताने । तेथे अर्जुना ॥४२३॥

नाहता त्या उपदेशात । मग्न झाला आत्मानंदात । हारपला त्या चांदण्यात । चंद्र जैसा ॥४२४॥

घोर त्या युद्ध समयाला । अर्जुनाने उपदेश ऐकिला । आणि त्या आत्मानंदाला । जाहला प्राप्त ॥४२५॥

कैशा कठीण त्या समयात । तो आत्मानंद होता भोगत । तुलना करताच नाही येत । तयाचि कोणा ॥४२६॥

गुण अर्जुनाचे पाहून । जाते मन पहा आनंदून । असे त्या संजयानं । म्हणले राया ॥४२७॥

अर्जुनाने जर भगवंताला । प्रश्नच नसता विचारला । मग लाभ कैसा असता झाला । आम्हाला राजा ॥४२८॥

अज्ञानाच्या त्या अंधारात । अडकलो होतो जन्ममरणात । अर्जुना कारणे ज्ञाना प्राप्त । जाहलो आम्ही ॥४२९॥

एवढा पहा थोर । अर्जुनाने केला उपकार । तो व्यासाचाच सहोदर । शोभतो की ॥४३०॥

मग संजय मनात म्हणाला । अर्जुन स्तुती नावडे राजाला । म्हणून आता स्तुतीला । देतो मी विराम ॥४३१॥

ऐसे ते सांगून । बोलणं सुरू केलं संजयानं । जे विचारत होता अर्जुन । भगवंताला ॥४३२॥

संजयाचे जैसे करणे । तैसे मीही करीन बोलणे । ऐकावे ज्ञानदेव म्हणे । निवृत्तीचा ॥४३३॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगोनाम सप्तदशोऽध्याय: ॥१७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधु नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्रदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०